पाक्षिक
वार्षिक वर्गणी रु. ३०
किंमत १ रुपया २५ पैसे

# शेतकरी संघटक

वर्ष ११ वे
अंक १२ वा
२१ ऑक्टोबर १९९४

# नागपूर अधिवेशन कशासाठी?

## खुली व्यवस्था व अ-राज्यवाद

खुली अर्थव्यवस्था आणि सरकारचा किमान हस्तक्षेप या संकल्पना मनमोहन सिंगांनी शोधलेल्या नाहीत.

महात्मा गांधींचा सारा विचारच अ-राज्यवादी होता. सरकार नांवाची गोष्टच नसणाऱ्या जगाचे त्यांचे स्वप्न होते. त्या स्वप्नाकडे जाण्याची पहिली पायरी म्हणून ते स्वराज्याच्या आंदोलनात उतरले. कॉंग्रेससारख्या राजकीय पक्षाचे नेतृत्व त्यांनी योजनापूर्वक हाती घेतले. इंग्रजांचे राज्य गेल्यानंतर अ-राज्यवादाकडे पावले टाकण्याआधीच त्यांची हत्या झाली.

येथून नेहरूंचा कालखंड सुरू झाला आणि गांधी विचाराचा सपशेल पाडाव करून समाजवादी समाजपद्धती, सार्वजनिक क्षेत्राचे प्रभुत्व, शास्त्रविज्ञानाचे महत्त्व, राष्ट्रीयीकरण अशा टप्प्याटप्प्याने साऱ्या राष्ट्राचे जीवन सरकारी कब्जात आणले. देशाच्या सुदैवाने शेतीचे सामूहिकीकरण करण्याची नेहरूंची योजना बारगळली. अन्यथा, येथेही लोकांना रशियाप्रमाणे भाकरीच्या तुकड्याची भीक मागावी लागली असती.

१९५९ साली चक्रवर्ती राजगोपालाचारी यांनी नेहरूप्रणित लायसन्स-परमिट-कोटा-इन्स्पेक्टर राज्याचा कडाडून विरोध केला आणि नेहरूंचा रस्ता विनाशाकडे जातो असे आग्रहाने मांडले.

१९८० सालापासून शेतकरी संघटनाही खुल्या व्यवस्थेचे आणि अ-सरकारी व्यवस्थेचे समर्थन करीत आहे. 'शेतकऱ्यांचे मरण, सरकारचे धोरण', 'गरिबी हटविण्यासाठी काहीही करण्याची आवश्यकता नाही, फक्त गरीबी टिकावी आणि वाढावी म्हणून सरकारने चालविलेले खटाटोप बंद झाले पाहिजेत', 'सरकार कोणतीच समस्या सोडवत नाही, सरकार हीच समस्या आहे', 'मंत्रालये सचिवालये पिशाच्यांची घरे आहेत, तेथे प्रवेश करून काहीच चांगले घडायचे नाही' या सगळ्या भूमिका शेतकरी संघटनेची निखळ अ-राज्यवादी भूमिका स्पष्ट करतात.

**शेतकरी संघटनेच्या नागपूर अधिवेशनासाठी श्री. शरद जोशींचा महाराष्ट्रव्यापी प्रशिक्षण दौरा या २० तारखेला पूर्ण झाला. संपूर्ण दौऱ्यात जिल्ह्यातील कार्यकर्त्यांच्या बैठका, विद्यार्थीमेळावे, व्यापारी व उद्योजकांच्या सभा आणि रात्रीची जाहिर सभा असे कार्यक्रम जवळजवळ सर्व जिल्ह्यांत भरगच्च उपस्थितीत पार पडले. नागपूर अधिवेशनाची घोषणा झाल्याबरोबर प्रचाराच्या कामाला लागलेल्या सर्व जिल्ह्यातील कार्यकर्त्यांच्या उत्साहात या प्रशिक्षण दौऱ्याने भर तर पडलीच पण त्यांच्याकडे झालेल्या चार कार्यक्रमांतून विचारांची शिदोरी मिळाली आणि प्रचाराची दिशा अधिक सुस्पष्ट झाली. आणि नागपूरला उद्योजकवादाच्या संस्कृतीचे स्वागत करण्यासाठी आता कितीतरी पटीने अधिक शेतकरी स्त्रीपुरुषांना आपल्यासोबत घेऊन येण्याचा विश्वास कार्यकर्त्यांत निर्माण झाला.**

**या दौऱ्यात श्री. शरद जोशी यांनी केलेल्या भाषणांतील काही टिपणे शेतकरी संघटकच्या मागील अंकात प्रकाशित केली होती. ती या अंकात पुनर्मुद्रित करीत आहोत.**

**२१ ऑक्टोबरपासून, किसान समन्वय समितीच्या आग्रहावरून श्री. शरद जोशी इतर राज्यांत दौरा करून अधिवेशनाचे निमंत्रण व कर्जमुक्ती आंदोलनाच्या नवीन स्वरूपाची माहिती त्या त्या राज्यांतील शेतकरी कार्यकर्त्यांना व शेतकऱ्यांना देतील. किसान समन्वय समितीच्या सदस्य संघटना आपापल्या राज्यांत या दौऱ्याची तयारी करीत असून उद्योजकवादाच्या संस्कृतीच्या स्वागताच्या या समारंभासाठी आपल्या राज्यातील शेतकरी मोठ्या प्रमाणात येतील असा विश्वास बाळगून आहेत.**

# सरकार कसे आहे?

गेली शंभर वर्षे सरकारने सगळे काही पहावे, शत्रूपासून संरक्षण करावे, देशात न्याय व सुव्यवस्था टिकवावी, आणि सर्व प्रजाजनांच्या बारशापासून ते बाराव्यापर्यंत शासन हजर असावे; शिक्षणापासून ते दूरदर्शनपर्यंत सर्वत्र शासनाचेच अधिपत्य असावे या विचाराचा पगडा राहिला. कोथिंबिरीपासून जहाजांपर्यंत सगळ्या वस्तूंचे उत्पादन किती व्हावे, कसे व्हावे हे ठरवावे सरकारने, नोकरी देणार सरकार, शिक्षण देणार सरकार, लोकांनी काय पाहावे, काय वाचावे ते ठरवणार सरकार अशी सर्वंकष, सर्वशक्तिमान, सर्वज्ञ सरकारची संकल्पना तयार झाली.

प्रत्यक्षात कोणत्याही सरकारने काही कामगिरी करून दाखविली असे नाही. सरकारने ज्या ज्या विचाराला हात लावावा त्याचा त्याचा नाश व्हावा हाच अनुभव. पण सरकार अयशस्वी झाले तर त्याला दूर करावे असे कोणी म्हणत नसे. सरकार अयशस्वी झाले तर अधिक सरकार आणा अशी हाकाटी होई. सरकार ही संस्था अपयशी ठरली आहे. पण ती जिंकलीच पाहिजे अशा कैफात लोक सरकार या संकल्पनेवर अधिकाधिक जुगार हरत गेले.

सरकाराचे सामर्थ्य हा एक बुद्धिभ्रम बनला. कोणताही प्रश्न असो, तो सरकारने सोडवावा अशी भाषा सर्वांच्या तोंडी बसली. घरासमोरील कचरा हलविण्यापासून ते ऑलिंपिक खेळाडूंच्या निवडीपर्यंत, 'सरकारकडे सोपवा, सरकारकडे सोपवा' अशी हाकाटी होऊ लागली. प्रत्येक वेळी सरकार नादान ठरले आणि प्रत्येक वेळी नादानपणाचे पारितोषक म्हणून नवीन नादानी करण्यासाठी लोकांनी सरकारला साधने आणि सत्ता दिली.

# सरकार कसे असावे?

आपल्या शरीराच्या सरकारसारखे असावे. देह हा देश समजले तर बुद्धी सरकार समजावी. शरीराच्या महत्त्वाच्या क्रिया म्हणजे पचन, श्वासोच्छ्वास, अभिसरण, चलनवलन, प्रजनन या कोणत्याच महत्त्वाच्या कामात बुद्धी हात घालत नाही. खाल्लेल्या भाकरीचे पचन होण्यासाठी क्षणाक्षणाला त्यात काय रस मिसळावे आणि कणाकणाने त्याचे रक्त कसे बनावे हे बुद्धीने ठरवायचे असते तर सारी मनुष्यजात नष्ट होऊन गेली असती. देहाच्या सरकारचे काम फार मर्यादित आहे. डास चावू लागला तर त्याला हाकलावे किंवा फटकारावे, माजलेला बैल चालून आला तर पळावे किंवा लपावे आणि बुद्धीच्या गबाळपणामुळे शरीराला नको असलेले पदार्थ पोटात गेले तर त्यावर औषधपाणी करावे एवढेच काम देहाचे सरकार करते. सरकारचे काम पोलिसाचे, लष्कराचे आणि शरीरातील वेगवेगळ्या संस्थांचे समन्वय करण्याचे.

देशाच्या सरकारचे काम एवढेच मर्यादित पाहिजे. चोर चिलट्यांपासून दाऊद इब्राहिमपर्यंत बंदोबस्त करणे ही सरकारची जबाबदारी. परकीय हाताने देशात ढवळाढवळ करू नये हीही जबाबदारी सरकारची. आणिबाणीची परिस्थिती सोडल्यास शेती, कारखाने, व्यापार, दळणवळण, शिक्षण अशा क्षेत्रांत सरकारने हस्तक्षेप करूच नये. सरकारी हस्तक्षेपाने फायदा तर होत नाहीच, तोटाच होतो.

सत्तेतून भ्रष्टाचार अपरिहार्यपणे निघतोच. सत्ता 'जादूचा दिवा' बनली की नेहरू घराणे, राममंदिर, मंडल आयोग, कोणताही विषय सत्तासंपादनाकरिता वापरण्याचा मोह पुढाऱ्यांना होतोच आणि लोकशाही संपते.

सरकारी हस्तक्षेपाने फळ काहीच मिळत नाही. काळा बाजार होतो, दादा-गुंड-तस्करांचे राज्य होते. हीच मंडळी अक्षरशः सरकार ताब्यात घेतात. वर नावाला लोकशाही पण प्रत्यक्षात, सर्वत्र गुंडांचे राज्य असे चित्र लगेच तयार होते.

## समर्थांना संरक्षण पांगळेच करणार

लालन-पालन, संगोपन-पोषण ही अर्भकांना आवश्यक आहे. पण ते वय संपले आणि कोडकौतुक चालू राहिले तर पोराचे भले होत नाही, तो गुळाचा गणपती बनतो.

पन्नास वर्षांच्या शोषणानंतर भारतीय शेतकरी जागतिक स्पर्धेत उभे राहाण्याची उमेद बाळगतो आणि लाडाकोडांनी पोसलेले कारखानदार स्पर्धेच्या कल्पनेनेच धास्तावले आहेत हे याचेच उदाहरण आहे.

पक्षीण पिलाला उडायला शिकवते. मोठ्या मायेने प्रेमाने त्याला उडण्यास उद्युक्त करते. एका पायरीवर ती निर्दयपणे पिलाला उंचावरून ढकलून देण्यास तयार होते. ही कठोरता ही आईच्या वात्सल्याची खरी कसोटी आहे.

पाण्यात पोहायला शिकायचे असेल तर पाण्याच्या बाजूला झोपून वर्षानुवर्षे हातपाय हालवले तर पोहायला येणार नाही. पोहायला शिकायचे तर पाण्यात उतरले पाहिजे, नाकातोंडात पाणी गेले पाहिजे, प्राण कंठाशी आले पाहिजे तेव्हा हातपाय तिरीमिरीने हालू लागतात आणि पोहण्यातील कला समजते.

# अनुभव आणि स्पर्धा यांच्यासारखे गुरु नाहीत

ही खुली व्यवस्था, खुली व्यवस्था म्हणतात, ती काय आहे? मुलियरच्या एका नाटकात एक नवश्रीमंत प्रियाराधनासाठी विद्वान बनण्याचे ठरवतो. शास्त्रीबुवांची शिकवणी लावतो. व्याकरणाच्या पहिल्याच धड्यात 'गद्य' म्हणजे काय याच्या व्याख्येचा प्रश्न येतो. बराच वेळ चर्चा चालल्यानंतर डोक्यात प्रकाश पडतो, ''म्हणजे आपण नेहमी बोलतो तेच गद्य होय?''

खुल्या व्यवस्थेचे असेच आहे. कोणी जाणूनबुजून आपल्याला बांधून टाकले नसले की त्याला म्हणायची खुली व्यवस्था. पिंजऱ्यातील पक्ष्याला किंवा वाघाला खुली व्यवस्था कसली समजावून सांगता? पिंजरा हीच दुष्ट व्यवस्था आहे. ती नसली की त्याला म्हणायचे खुली व्यवस्था.

आर्ट बुकवॉल्ड हा एक प्रख्यात अमेरिकन विनोदी लेखक. न्यूयॉर्कच्या प्रदूषित हवेत जन्म काढलेला. आर्क्टिक वृत्ताजवळील एका विमानतळावर उतरला, विमानाच्या बाहेर पडताच त्याचा जीव घाबरा होऊ लागला. 'हा कसला घाण वास आहे?' त्याने तक्रार केली. लोकांनी सांगितले, ''ही स्वच्छ हवा आहे.'' नेहरूशाही, समाजवाद, सरकारशाही यांच्या प्रदूषणाला आम्ही इतके सरावलो आहोत की खुलेपणाने काही अपाय तर होणार नाही? खुलेपणाने आम्ही गुलाम तर बनणार नाही? असले प्रश्न विचारीत आहोत.

चिनी मुलींचे लहानपणापासून पाय बांधून ठेवण्याची पद्धत होती, ते बारीक आणि नाजूक दिसावेत म्हणून. कायद्याने पाय बांधण्यास बंदी झाली, पायावरील पट्ट्या सोडण्यात आल्या तेव्हा लहान मोठ्या स्त्रिया पायातील वेदनांबद्दल तक्रार करू लागल्या, पुन्हा पट्ट्या बांधा म्हणू लागल्या. समाजवादी विचाराच्या प्रभावाने दुसऱ्याच्या जिवावर जगण्याची आणि निर्बुद्धपणे चाकोरीतील आयुष्य जगण्याची आम्हाला इतकी गोडी लागली आहे की आम्हाला मोकळे करणाऱ्यांचाच आम्ही रागाराग करतो आहोत?

लेखकाने एक सुंदर कथा सांगितली आहे. डोंगरातून खळबळ वाहात येणाऱ्या एका ओढ्याच्या शुभ्र पाण्याच्या तळाशी दगडगोटे आणि त्यात शेवाळे साचलेले. त्या शेवाळ्याच्या विश्वात अनेक जीवजंतू जिवाच्या आकांताने दगड गोट्यांना, शेवाळाला धरून राहिलेले त्यांच्या साऱ्या आयुष्याचे उद्दिष्ट फक्त ओढ्याच्या तळाला चिकटून राहाणे, त्यातील एका मनस्वी किड्यास या जगण्याचा कंटाळा येतो. आधार सोडून पाण्याबरोबर स्वच्छंदपणे वाहावे असे त्याला वाटते. सारे बुजुर्ग त्याला मरणाची धास्ती दाखवतात. पण तरी हिम्मत करून एक दिवस तो स्वतःला झोकून देतो. पाण्याचा प्रचंड ओघ त्याला उचलून या खडकावर, त्या तटावर आपटतो. तो जखमी होतो पण थोड्या वेळात आपण पाण्याच्या प्रवाहाबरोबर आंनदाने वाहात आहोत हे त्याच्या लक्षात येते. खाली तळाशी बसलेले असंख्य जीवजंतू त्याच्याकडून पाहून विस्मय करतात. 'तो तर महात्मा आहे. त्याला आपल्यासारख्या चिंता काहीच नाहीत.''

स्वातंत्र्याची चव अनुभवाने कळते, त्याची रूची अनुभवानेच वाढते. उलट बंधने ठेवली तर त्याच्या दुःखांची सवय होते आणि बंधनेच नैसर्गिक वाटू लागतात.

# पिशाचमहालात घुसून पिशाचांना हकला

गेल्या पंधरा वर्षांच्या इतिहासात शेतकरी संघटनेने अनेक दैदीप्यमान विजय मिळविले. त्यातील दोन विशेष महत्वाचे.

एक : गरीबीचे मूळ काय? या प्रश्नाचे उत्तर. सरकार जाणीवपूर्वक, धोरणपूर्वक शेतकऱ्यांची करीत असलेली लूट हे संघटनेने आग्रहाने मांडले. सारे बुजुर्ग, पंडित, विद्वान कुचेष्टा करीत होते. आज सरकारी दस्तावेजाने संघटनेचा सिद्धांत सिद्ध झाला आहे.

दोन : सरकार उपायाची गोष्ट नाही, अपायाची आहे हे संघटनेने सांगितले, त्यावेळी बहुतेक जग सरकारवादी होते. मास्कोचा पाडाव, नेहरूशाहीचे पतन आणि डंकेल प्रस्ताव शेतकरी संघटनेच्या विचाराच्या सार्थकतेची प्रमाणपत्रे आहेत.

पंधरा वर्षांत हा चमत्कार घडला पण संघटनेला अजून काही कामे संपवायची आहेत. मुख्य शल्यक्रियाझाली आहे पण काही उपचार आवश्यक आहेत.

संघटनेच्या हाकेस शेतकऱ्यांनी आवश्यक तो प्रतिसाद दिला नाही. काही दुर्दैवी अपघात अडथळा बनून आले. १९८४ सालीच स्वातंत्र्यवर्ष साजरे व्हायला पाहिजे होते ते झाले नाही. दिरंगाई झाली.

मूळची जखम आर्थिक पण ती आता नासते आहे. शासनाच्या अर्थसत्तेतील लुडबुडीमुळे बेकारी, महागाई आणि कर्जबाजारीपणा माजलाच. पण त्या पलिकडे जाऊन आता भ्रष्टाचारी, गुन्हेगारी व पुढारी यांची युती, आणि माजलेल्या पुढाऱ्यांच्या दुसऱ्या पिढीची मायबहिणीवर हात टाकण्यापर्यंत गेलेली मजल.

रावण आणि दुर्योधन यांची सहस्र पापे. पण सतीवर हात उचलल्याने घनघोर युद्धांची सुरुवात झाली. पोटात भूक असलेला शेतकरीसुद्धा पहिल्यांदा या दुष्ट राक्षसांचे निर्दालन करा म्हणून आक्रोश करतो आहे.

१९८४ सालापर्यंत शेतकऱ्यांची लढाई नेटाने संपली असती तर शेतीमाल रोकण्याचे हत्यार पुरे पडले असते. आता शासनाच्या पिशाचमहलात घुसून त्याला तेथून हुसकावण्याची गरज आहे. काम कठीण नाही. एका भारतीय गोर्बाचेव्ह, एक भारत मागरिट थॅचर शत्रूच्या बालेकिल्ल्यात पोहोचली तर एकविसाव्या शतकाची सुरुवात होण्यापूर्वी 'गरीब बिचारा' समजला जाणारा भारत वैभवाकडे वाटचाल करू लागला असेल.

## खुली व्यवस्था टप्पा नव्हे, मार्ग आहे

खुली व्यवस्था अशी काही गोष्टच नाही. इतिहासात नव्हती, वर्तमानात नाही आणि भविष्यातही कधी असणार नाही, पण खुलेपणाकडे आपण वाटचाल करून शकतो. आजच्या पेक्षा अधिक खुले होऊ शकतो. पूर्णपणे स्वतंत्र कधीच होणार नाही, पण अधिकाधिक स्वतंत्र नक्कीच होऊ शकतो.

खुली व्यवस्था म्हणजे काही स्वर्ग नाही. मार्क्स्‌च्या वर्गविरहित समाजाप्रमाणे, गांधींच्या रामराज्या-प्रमाणे ते काही स्वप्नरंजन नाही. जेथे गेल्यानंतर कोणती चिंताच उरत नाही, सर्व काही आनंदी आनंद असते हे पऱ्यांचे राज्य नाही.

खुली व्यवस्था म्हणजे कष्ट आहेत. माणसाला वारश्याने मिळालेल्या साऱ्या संस्थांचा अधिका-धिक व्यापकतेने उपयोग करून हरेक क्षेत्रात कुशलता वाढवावी यासाठी ही धडपड आहे. या धडपडीने दुःख होते, आजारही उद्‌भवतात. असली दुःखे, असले आजार गुलामांच्या वाटेस जात नाहीत. ती सहन करण्याचे भाग्य स्वातंत्र्याच्या यात्रिकांनाच मिळते. शांती, सुख, समाधान शोधणाऱ्यांना हा रस्ता झेपायचा नाही. हा रस्ता खाचखळग्यांचा आहे. काट्या-कुट्यांचा आहे. म्हणूनच त्यावर चालण्यात आयुष्याचे सार्थक आहे.

# आजादी की सेना फिर तैयार करो

*आजादी की सेना फिर तैयार करो*
*हर दिल की धड़कन का कुछ अंदाज करो ... आजादी की .....*
*स्वतन्त्र भारत का जग में गूंज उठे नारा ऽऽऽ*
*गांधी के सपने को साकार करो .... तैयार करो .... आजादी की .....*

*हर मेहनतकश का फीका त्योहार यहां है ।*
*बिना काम के नौकर का बाजार यहां है ।*
*कब तक होने दोगे इज्ज़त का सौदा,*
*कब तक टूटेगा नौकरशाही का फंदा*
*अब तो कुछ सोचो और विचार करो .... तैयार करो .... आजादी की ..... ।।१।।*

*तुमको भी होगा हालात मालूम यहां का ।*
*टके-टके में बिक जाता कानून यहां का ।*
*सत्ता के चौखट पर मानवता रोती*
*हर पल नई चुनौती को स्वीकार करो .... तैयार करो .... आजादी की ..... ।।२।।*

*नेहरू की नीति का यह कैसा अनुशासन*
*अपराधी की लकडी पर नाचे शासन*
*रिस्वतखोर लुटेरों का है मान यहां*
*इनसे लडने की हुंकार करो .... तैयार करो .... आजादी की ..... ।।३।।*

*संविधान में समाजवाद के हैं चर्चे ।*
*फिर भी फुटपाथो पर भूखे क्यो मरते ।*
*कहना कुछ करना कुछ और लिखना कुछ है,*
*ऐसी नीति का मिलकर बहिष्कार करो .... तैयार करो .... आजादी की ..... ।।४।।*

*अन्नदाता के संग गंदा व्यवहार किया है*
*लूट में शासन शामिल है स्वीकार किया है*
*ऋणात्मक सबसिड़ी चौवीस हजार करोड़ की,*
*गांव गांव में जाओ और प्रचार करो .... तैयार करो .... आजादी की ..... ।।५।।*

*जाति धर्म की खडी हुई दीवार तोड़ दो ।*
*पाप की दुनियां में गंगा की धार छोड़ दो ।*
*सब से पक्का रिस्ता वतन के खून का,*
*कह दो ! और सावधान संचार करो .... तैयार करो .... आजादी की ..... ।।६।।*

*नेता-गुण्डा-शोषण-वाद बंद करो ।*
*लाईसेन्स-कोटा-परमिट राज बंद करो ।*
*नयी रोशनी लाओ खुली व्यवस्था की*
*इसकी खातिर चाहे फिर से करो, मरो .... तैयार करो .... आजादी की ..... ।।७।।*

**अजय अनमोल,**
महासचिव, किसान यूनियन (उ.प्र.)

# शासनाचे महिला धोरण किती खरे - किती खोटे ?

**आमदार सौ. सरोज काशीकर**
अध्यक्षा, शेतकरी महिला आघाडी

महाराष्ट्र सरकारचे महिलांसंबंधी धोरण म्हणजे स्वबळावर, स्वतःच्या आत्मविश्वासावर निर्भिडपणे, शासनाच्या कुबड्या न घेता जगणाऱ्या स्त्रियांना केवळ कागदाच्या भेंडोळ्याच्या ओझ्याखाली दाबण्यासाठी केलेला प्रयत्न आहे.

ज्या स्त्रियांनी विकासाचा मार्ग या पुरुष प्रधान व्यवस्थेला दाखवून स्वतःसाठी स्वप्रयत्नाने नवीन मार्गाचा शोध घेतला, त्या प्रतिभाशाली स्त्री समाजाला मोठमोठ्या आशा दाखवून अनेक समित्या व आयोग स्थापन करून तिच्या मार्गावर केवळ अंधार पसरवण्याचा हा प्रयोग आहे.

स्त्रीप्रश्नाची उकल अनेक संघटना व सेवाभावी संस्थांच्या माध्यमातून वर्षानुवर्षे होत आहे. या प्रश्नाची तड लावण्याचा प्रयत्न स्त्रिया स्वतःच्या ताकदीनिशी करीत आहेत. सरकारकडे काय जी कायदा व सुव्यवस्था आहे ती योग्य प्रकारे राबवली जावी म्हणून अनेक ठरावांच्या माध्यमातून सरकारला जागे करण्यात प्रयत्नशील आहेत. त्या ठरावांवर विचार करून स्त्रीला न्याय देण्याचे सामर्थ्य शासनात कुठे दिसून आले नाही. त्या नाकर्तेपणावर पांघरुण घालण्याकरिता सरळ सरळ काही अधिकारी हाताशी घेऊन एक सोनेरी मुलामा चढवलेले धोरण २२ जून ९४ ला गाजावाजा करून घोषित झाले.

१९९० साली राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना अगदी अशीच धूमधडाक्यात झाली. त्याचे कार्य, स्वरूप व उद्देश काय याची स्पष्टता राष्ट्र पातळीवर सर्वसामान्य स्त्रियांना होण्यापूर्वीच महाराष्ट्र शासनाने जानेवारी १९९३ ला महाराष्ट्र महिला आयोग स्थापन केला. या महाराष्ट्र महिला आयोगाला टेकू देण्याकरिता जिल्हा स्तरावर महिला व बाल विकास खात्याची जोड देण्यात आली. जानेवारी ९३ ते जानेवारी १९९४ पर्यंत याही आयोगाचे स्वरूप आम्हा महिलांना स्पष्ट झाले नाही. केवळ आयोगाच्या अध्यक्षाचा मंत्र्याचा दर्जा व लाल दिव्याची गाडी, सोयीसवलती या पलिकडे या आयोगाचे भरीव असे स्वरूप दिसले नाही. आयोगाचे कार्याबद्दल न बोललेच बरे. नाही म्हणायला विभागीय परिषदा मात्र घेण्यात आलेल्या आहेत. महिला व बाल विकास खात्यात योजना मोठमोठ्या. त्या योजनांचा अभ्यास केला असता नवीन बाटलीत जुनीच औषधं असे चित्र दिसते.

या खात्यामार्फत राबविण्यांत येणारे प्रमुख कार्यक्रम म्हणजे कुटुंब नियोजन, हुंडाबंदी, आरोग्य व शिक्षणावर भर आणि आर्थिक विकास.

या नव्या खात्यापूर्वी अनेक शासकीय समाज कल्याण खात्यांनी खात खात ह्या योजना अंमलात आणण्याचा देखावा उभा केलाच होता, पण आता महिला सभापती व सदस्यांच्या मार्फत त्याचा समारोप बाकी होता. खाते आहे, सभापती आहे, फंड आहे पण अजूनही कार्यक्रम व रूपरेषा नाही या स्थितीत हे खाते कार्यरत आहे, कारण महिला क्षेत्रातही सत्ता टिकविण्यासाठी हे खाते स्थापन केले आहे, विकासासाठी नव्हे याची प्रचिती येते. विकासाच्या संकल्पनेत बरोबरीच्या सहभागाची संकल्पना अशा सुबक वाक्यरचनेतून महिला धोरणाची पार्श्वभूमी स्पष्ट करण्यांत आली व आजपर्यंत या सर्व विकास आराखड्यातील विविध योजना व कार्यक्रमाला दिशा देण्याचे सुस्पष्ट प्रयत्न होत नाहीत ही गोष्ट स्पष्ट झाली.

### धोरणाचे ध्येय व उद्दिष्टे

महाराष्ट्र राज्यांतील स्त्रियांची शारीरिक, मानसिक, भावनिक गुणवत्ता सुधारण्याचे व राजकीय, आर्थिक सामाजिक, मानसिक व सांस्कृतिक क्षेत्रात समानता प्रस्थापित करण्याचे उद्दिष्ट अगदी बालीश वाटतात. मुळातच ज्या पुरोगामी महाराष्ट्राची धुराच विविधतेने संपन्न असलेल्या स्त्रियांवर आहे. तिलाच समानता देणे म्हणजे तिचे पंख छाटणे होय. ४० वर्षांतसुद्धा विकासाची फळे ज्या स्त्री समाजाला शासनाच्या माध्यमातून मिळाली नाहीत ती स्त्री रडत न बसता सर्व क्षेत्रात प्रभाव पाडते. मग ते क्षेत्र वैमानिकाचे असो, आय.पी.एस. (किरण बेदी, रश्मी

**महाराष्ट्र शासनाचे मुख्यमंत्री श्री. शरद पवार घोषणांवर घोषणा करत आपल्या शासनाच्या महिला धोरणाचे ढोल बडवीत महाराष्ट्रभर फिरत आहेत. महिला धोरणामध्ये दारूदुकानबंदीसंबंधी केलेल्या तरतुदीनुसार महाराष्ट्रातील असंख्य गावांतील ग्रामसभांमध्ये महिलांनी आपापल्या गावांतील दारूदुकाने बंद करावी म्हणून ठराव केले, ते मुख्यमंत्र्यांकडे, जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविले. वाट पाहाताहेत, पण अजूनही ही दुकाने बंद करण्याची कारवाई शरद पवारांच्या शासनाचे प्रशासन करतांना दिसत नाही. वाट पाहण्याची हद्द संपलेल्या अकोला जिल्हा शेतकरी महिला आघाडीच्या कार्यकर्त्या सौ. नलिनी गावंडे व सौ. इंदिराबाई नांदुरकर यांच्या नेतृत्वाखाली माना येथील महिला व गावऱ्यांनी शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांच्या सहकार्याने त्यांच्या गावातील ठराव झालेले दारूदुकान नष्ट केले. त्यावेळी महाराष्ट्र शासनाच्या गणवेशधारी गुंडांनी (पोलिसांनी) महिलांसह सर्व कार्यकर्त्यांना निर्घृण मारहाण केली. त्यातील जखमींवर इकडे अकोला जिल्हा रुग्णालयात अजून उपचार चालू असतानाच मागील आठवड्यात माननीय मुख्यमंत्र्यांनी पुण्यामध्ये घोषणा केली की शहरांतील वार्डावार्डातील स्त्रियांनी बहुसंख्येने मागणी केल्यास त्यांच्या वार्डातील दारूदुकाने बंद केली जातील! केवळ घोषणांसाठी घोषणा करणाऱ्या आणि आता महाराष्ट्रातील महिलांचे केवळ आपणच तारणहार आहोत असा आविर्भाव आणणाऱ्या महाराष्ट्र शासनाच्या 'महिला धोरणा'चा शेतकरी महिला आघाडीच्या अध्यक्षा आमदार सौ. सरोज काशीकर यांनी घेतलेला हा वरवरचा समाचार.)**

अवस्थी, मेरी फर्नांडिस) पोलिस अधिकाऱ्याचे असो वा बेदकारपणे मजुरी करून पोट भरणाऱ्या रत्नप्रभा खंडारे वा झाराबाईसारख्या शेतमजूर स्त्रीचे असो. दारूबंदीसारख्या प्रश्नावर त्या पेटून उठतात व समाज परिवर्तनाचा लढा देतात. त्यांच्या मार्गात मात्र सातत्याने काटे पसरवणारे सरकार कोणते उद्दिष्ट या धोरणातून साध्य करेल?

## उपाययोजना व रचना

खऱ्या अर्थाने महिलांना समानता देण्याची भाषा वापरणाऱ्या सरकारने १००% स्थानिक स्वराज्य संस्था महिलांकडे असाव्या, या शेतकरी महिला आघाडीच्या ठरावाचा निश्चितपणे जर विचार केला असता व संपूर्ण सत्ता स्थानिक स्त्रियांना दिली असती, तर या क्षुल्लक उपाययोजना निश्चितच त्यांनी समर्थपणे अंमलात आणल्या असत्या यात शंका नाही.

दारू दुकान बंदी, पत्नीच्या नावे जमिनी, गावातील आरोग्य, बाल विकास व शिक्षण या विषयी त्यांनी निश्चितच विधायक काम केले असते. कुटुंब प्रमुख नव्हे तर स्थानिक स्वराज्य प्रमुख म्हणून स्वतःचे स्थान त्यांनी निर्माण केले असते. पण, प्रत्यक्षात वृक्षाच्या मुळावर घाव घालायचा व फांद्यांना पाणी घालायचे हे सरकारचे मूळ धोरण असल्यामुळे या सर्व उपाययोजना व रचना उन्मळून पडतील.

स्थानिक स्वराज्य संस्था व सहकार क्षेत्रातील राजकीय गुंडाची गुंडशाही बंद केल्याशिवाय विकासाकडे लक्ष केंद्रित करण्याच्या गोष्टी म्हणजे लंकेत सोन्याच्या विटा असण्यासारखे आहे.

## महिलांवरील अत्याचार व हिंसा

महिला विकास मार्गात भय हा सर्वात मोठा अडथळा आहे, ही कबुली देऊनही भय नष्ट करण्याकरिता भय निर्माण करणारे कत्तलखाने नष्ट करण्याचे सामर्थ्य मात्र या धोरणात नाही. ज्या पोलिस व्यवस्थेकडून सुरक्षा व व्यवस्थेच्या निर्मितीची भाषा शासन बोलते ती व्यवस्थाच मुळात भ्रष्ट पायावर आधारित आहे. स्त्रियांवर अन्याय व अत्याचाराची सुरुवातच या ठिकाणाहून झालेली आहे. गुन्हा सिद्ध न होता वर्षानुवर्षे तुरुंगात स्त्रियांना खितपत ठेवून त्यांचे आत्मबल खच्ची करण्याचे काम या कत्तलखान्यात होते. मग कसाई स्त्रीलिंगी की पुरुषलिंगी याला अर्थ नाही. खरेच भय घालवायचे असेल तर दारू अड्डे प्रथम बंद करा. भ्रष्टाचारी अधिकारी कर्मचाऱ्यांना देहदंड देण्याइतके असामान्य नको पण नोकरीतून ताबडतोब कमी करण्याचे धाडस दाखवा व न्यायव्यवस्था गतिमान करा.

**सहाय्यक प्रशासन** - ही शासकीय मदतीने सुरू असलेली संस्था चालकांच्या कुरणाला अभय देणाऱ्या योजनांची खैरात आहे असे म्हटल्यास निरर्थक ठरणार नाही.

एकीकडे आत्मविश्वास निर्माण करण्याचा टेंभा मिरवायचा व दुसरीकडे 'पंडितराव सपकाळे'ची बिनबोभाट व्यवस्था करून ठेवायची हेच यातून स्पष्ट होते. जर स्त्रीला संपत्तीत अधिकार मिळणार आहे, कायदा तिच्या बाजूने उभा होणार आहे तर या शासकीय कुरणांची गरजच काय? स्वयंसेवी संस्था हे कार्य करण्यास समर्थ आहेत.

## महिला आणि कायदा

जे कायदे मुळातच लोकाभिमुख नाहीत त्यांचा अर्थ न्याय देण्यास उपयुक्त ठरत नाही. त्या कायद्याचे मूल्यमापन करून ते ताबडतोब रद्द करणे ही गरज आहे, पण त्यात हस्तक्षेप (सुधारणेच्या नावाखाली) करून अधिक चिकट बनविण्यापलिकडे शासन काही करू शकेल असे वाटत नाही.

## आर्थिक दर्जामध्ये सुधारणा

नोकरी व आरक्षणाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात आर्थिक दर्जा सुधारणांवर भर दिला जाणार व महिलांना सोयीसवलती पुरेशा उपलब्ध व्हाव्या या करिता प्रयत्न करणार म्हणजे नेमके काय? सोयीसवलती नोकरी व आरक्षणाचे मृगजळ स्त्रियांना या धोरणाच्या माध्यमातून दाखविण्यात येत आहे. आजच्या स्पर्धेत टिकण्याकरिता स्पर्धेची आणि उद्योजकतेची आवश्यकता आहे. कल्याणकारी धोरणापेक्षा ठोस आर्थिक धोरण आखण्याला आज महत्त्व आहे.


महिला आर्थिक विकास महामंडळाला (माविमं) जास्त अधिकार देऊन राजकीय हस्तक्षेपाशिवाय स्त्रीला उद्योजकतेकडे नेण्याचा जर प्रयत्न केला तरच आरक्षणाच्या कुबड्यांशिवाय आम्ही महिला उद्योग व कामे मिळविण्यास सक्षम आहोत असे दिसेल. फक्त या संस्था कोणत्याही राजकीय पक्षाच्या हातातील बाहुले नसलेल्या म्हणजे झाले.

## प्रसार माध्यमे आणि समर्थन

दूरदर्शन हे घरात एक अविभाज्य स्थान मिळवून बसले आहेत. या माध्यमातून अभ्यास, निरनिराळी माहिती व मनोरंजन या गोष्टीची अपेक्षा. पण अतिरंजित व स्त्रियांचे बिभत्स चित्रण दाखविण्यांत सिनेमा व सिरीअलच्या माध्यमातून जणू काही चढाओढ लागलेली आहे. मराठी क्षेत्रही यातून सुटत नाही. सेन्सॉर बोर्डाचे काम काय व ते किती खालच्या स्तरावर गेलंय याची जाण जनसामान्याला आहे. आता धोरणाच्या माध्यमातून आळा जर घातला तर स्वागतार्ह आहे.

स्वयंसेवी व अशासकीय यंत्रणा स्वबळावर महिला विकासाचे कार्य करीत आहेत. त्यांच्या कार्यात वेगवेगळ्या मार्गाने अडथळे आणले गेले नाही व त्यांना पक्ष, प्रांत, जात, धर्म या बंधनात अडकवले नाही, तर त्यांच्या माध्यमातून आरोग्य व योग्य शिक्षण मिळण्यास मदत होवू शकेल हे निश्चित. सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन प्रमाणे सर्व महिला विकासाचे हक्क महाराष्ट्र शासनाचे स्वाधीन असे न करता, मुक्त व निर्भयपणे जगण्याची संधी प्रदान करणारी दृष्टी जरी शासनाने दाखविली तरी महिलांच्या समस्या सुटण्यास मदत होईल. अन्यथा इतर घटकांच्या नियोजनबद्ध विकासाच्या संकल्पनेमुळे विकासाऐवजी परावलंबीत्वच जास्त वाढेल. शासनाने महिला धोरणाच्या नियोजनबद्ध चाकोरीत आम्हांला अडकवून परावलंबी बनवू नये एवढेच.

**महाराष्ट्र शासनाच्या महिला धोरणाचे विच्छेदन करणारी पुस्तिका लवकरच प्रकाशित होत आहे. त्या पुस्तिकेमध्ये शेतकरी महिला आघाडीच्या त्या कामासाठी नियुक्त केलेल्या समितीने केलेला अभ्यास असणार आहे.**



## शेतकरी संघटना - सहावे अधिवेशन
### नागपूर
# लेखा ) हिशोबासंबंधी महत्त्वाचे ( जोखा

शेतकरी संघटनेच्या नागपूर अधिवेशनासाठी जमा करावयाच्या निधीबाबत संबंधित कार्यकर्त्यांनी काटेकोरपणे हिशोब ठेवणे आवश्यक आहे.

यासाठी सर्व जिल्हाप्रमुखांना आणि जिल्ह्यातील प्रमुख कार्यकर्त्यांना कळविण्यात येते की आपल्या जिल्ह्यामध्ये –

| | |
|---|---|
| १. गावनिधी | २. स्वागतसमिती सदस्यता शुल्क |
| ३. अधिवेशन निधी | ४. स्मरणिका जाहिराती शुल्क |

या आणि अशा प्रकारची पावतीपुस्तके आणली गेली असतील त्यांचा, तसेच स्थानिक पातळीवर काही पावती पुस्तके तयार केली असल्यास त्यांचाही पूर्ण हिशोब वापरलेली व बिनवापरलेली पावतीपुस्तके व रक्कम यांसहित नागपूर येथील अधिवेशन कार्यालयामध्ये त्यासाठी सुरू केलेल्या कक्षामध्ये दि. ११ नोव्हेंबर, १९९४ रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत सादर करावयाचा आहे.

या वेळापर्यंत ज्या जिल्ह्यांचे हे हिशोब पूर्णपणे सादर केले जातील त्याच जिल्ह्यातील शेतकऱ्यांची 'कर्जाचा लेखाजोखा' प्रमाणपत्रे अधिवेशनाच्या दिवशी म्हणजे दि. १२ नोव्हेंबर १९९४ रोजी वितरीत केले जातील. हिशोब अपूर्ण राहिलेल्या जिल्ह्यांतील शेतकऱ्यांची प्रमाणपत्रे वितरीत केली जाणार नाहीत.

सर्व जिल्हाप्रमुखांनी याची नोंद घ्यावी.

**– शरद जोशी**

# प्रकाश पोहरे आदि कार्यकर्त्यांची सुटका


२१ सप्टेंबर रोजी मूर्तिजापूर तालुक्यातील माना येथील दारू दुकान उध्वस्त करणाऱ्या अकोला जिल्ह्यातील शेतकरी संघटनेचे नेते श्री. प्रकाश पोहरे, श्री. रांवसाहेब कांबे, शेतकरी महिला आघाडीच्या कार्यकर्त्या सौ. नलिनीताई गावंडे, सौ. इंदिराबाई नांदुरकर यांच्यासह अटक केलेल्या सर्व कार्यकर्त्यांची २० दिवसांच्या तुरुंगवासानंतर सुटक करण्यात आली. अकोला जिल्ह्यातील दारू दुकान बंदीचे आंदोलन अधिक तीव्र करण्याचा निर्धार वीस दिवसांच्या तुरुंगतपश्चर्येनंतर या कार्यकर्त्यांनी व्यक्त केला. जिल्ह्यातील जनतेचाही सहभाग या आंदोलनात वाढणार आहे.

दरम्यान, ११ ऑक्टोबर रोजी आपण स्वतः हजर राहून माना येथे पोलिस संरक्षणात सुरू झालेले दारूदुकान लाखो शेतकऱ्यांच्या उपस्थितीत फोडू. अशा शरद जोशींनी केलेल्या घोषणेचा परिणाम होऊन ते दुकान मालकाने बंद केले. त्यामुळे ११ ऑक्टोबरचे आंदोलन करावे लागले नाही.

**शेतकरी प्रकाशन : २०**

**शेतकरी संघटनेच्या राजकीय भूमिकेचा सुरूवातीपासून आढावा घेणारी पुस्तिका प्रकाशित झाली आहे.**

**पुस्तिकेची किंमत रुपये १०/- मात्र.**



धडधाकटांचे हातपाय लुळे करणारे नंतर कुबड्या अन् हाती कटोरे देणारे

**सरकार नको**

**सरकार हवे**

**उत्पादकांच्या अन् उद्योजकांच्या वाटे अडचणी, अडथळ्यांनी पसरती जे काटे त्यांचे निर्दालन करणारे.**

Posted at Market Yard, PSO, Pune 37.
On October 21, 1994

To

**SHETKARI SANGHATAK**
(Marathi Fortnightly)
Regd. No. 39926/83
October 21, 1994

**PNCW 281**
Licence to post without prepayment
**No. 87**

## महिला आघाडी

## आणि

## शेतकरी संघटना

# संयुक्त अधिवेशन नागपूर

# अब नहीं सहेंगे

**नेता, तस्कर**
**गुंडा, अफसर**
**दाये बायें मध्यममार्गी**
**मंडल मंदिर मस्जिद वादी**

# अब किसान लाया

**उद्योजकयुग**
**विश्वमुकुट**
**स्वतंत्र भारत**

**१२ नोव्हेंबर १९९४**
**ठिकाण : कस्तुरचंद पार्क, नागपूर.**
**सायंकाळी ५ वाजता**

**सक्षम उद्योजकतेची हत्या करणाऱ्या आणि कल्याणकारी अर्थव्यवस्थेच्या नावाने संपूर्ण समाजाला पंगू करणाऱ्या समाजवादाला फेकून देऊन उद्योजकवादाच्या संस्कृतीचे स्वागत करण्यासाठी आणि**

**शेतकऱ्यांना हजारो वर्षांच्या आर्थिक गुलामगिरीतून बाहेर पडण्यासाठी खात्रीशीर प्रयत्न करण्याची संधी देणाऱ्या खुल्या व्यवस्थेला अडथळा आणणाऱ्या**

**आणि समाजवादाच्या छत्राखाली पोसलेल्या सरकारशाही, नोकरशाही, गुंडपुंडगिरी आणि सरकारच्या नामर्दपणामुळे उन्मत्त झालेल्या जातीयवादी शक्तींना निष्प्रभ करण्यासाठी लाखोंच्या संख्येने हजर रहा.**

**सौ. सरोज काशीकर**
अध्यक्ष, शेतकरी महिला आघाडी

**श्री. पी. एस्. ठाकरे**
स्वागताध्यक्ष, शे. सं. ६ वे अधिवेशन

**पाशा पटेल**
अध्यक्ष, शेतकरी संघटना

**श्री. राम नेवले**
कार्याध्यक्ष, शे. सं. ६ वे अधिवेशन

**६ व २१ तारखेला प्रसिद्ध होतो.**
**प्रकाशन स्थळ व पत्रव्यवहाराचा पत्ता**
**अंगारमळा, मु. पो. आंबेठाण (४१० ५०१)**
**ता. खेड, जि. पुणे.**

**संपादक, मुद्रक, प्रकाशक**
**सुरेशचंद्र म्हात्रे**
**फोन : द्वारा - चाकण ५२३५४/५२४६८**
**एस्.टी.डी.-०२१३५**

**पाक्षिक शेतकरी संघटक**
**मालक – मोहन बिहारीलाल परदेशी**
**मुद्रण स्थळ – गणेश प्रिंटर्स,**
**६९३, बुधवार पेठ, पुणे - २.**